


दैनिक
जनसामान्यांचे शस्त्र
बीड, छ.संभाजीनगर, जालना, नांदेड, परभणी, लातूर, धाराशिव

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे
https://epaper.marathwadapatra.com

बीड • वर्ष ४ थे • अंक २३९ वा • पाने-४ • शुक्रवार,दि.०६ डिसेंबर २०२४ • पान -१ • RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 • Post : Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • dailymarathwadapatra2021@gmail.com किंमत ३ रूपये




## मी देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस...ईश्वर साक्ष शपथ घेतो की

# महाराष्ट्र राज्यात देवेंद्रपर्वाला सुरूवात



## एकनाथ शिंदे,अजित पवारांनी घेतली उपमुख्यमंत्रीपदाची शपथ



मुंबई, दि. ५ (वृत्तसेवा):- महाराष्ट्राच्या १४ व्या विधानसभा निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर महायुतीचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. तर, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार, शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासह उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी ते बिहारचे ▶▶पान २ वर



### एकनाथ शिंदे पहिल्यांदा उपमुख्यमंत्री

शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी अखेर मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आहे. एकनाथ शिंदे देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमध्ये सहभागी होणार की नाही याबाबतच्या चर्चा सुरु होत्या. त्या सर्व चर्चांना पूर्णविराम ▶▶पान २ वर

### अजित पवार सहाव्यांदा उपमुख्यमंत्री

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून अजित पवार यांनी सहाव्यांदा शपथ घेतली. २०१९-२०२४ या कालावधीतील तीन राज्य सरकारांमध्ये अजित पवार राज्याचे उपमुख्यमंत्री होते. अजित पवार २०१० मध्ये पहिल्यांदा उपमुख्यमंत्री ▶▶पान २ वर

## कुत्र्यांनी पाडला हरणाचा फडशा; अफवा मात्र बिबट्याची

अंबाजोगाई, दि.५ (मराठवाडा पत्र न्युज):- अंबाजोगाई तालुक्यात एक खळबळजनक घटना पुन्हा समोर आली आहे. मौजे कुंबेफळ गावात एका हरणाचा फडशा पाडल्याची घटना उघडकीस आली आहे. दरम्यान, मृत पावलेल्या हरणाचा फडशा बिबट्याने पाडला की, अन्य मोकाट जनावराने या बद्दल तर्कवितर्क लढविले जात आहेत. या संदर्भात वनाधिकारी विजया शिंगाटे यांच्याशी बातचीत केली असता त्यांनी 'त्या' हरणाचा फडशा मोकाट कुत्र्याने पाडला असल्याची माहिती दिली आहे. अंबाजोगाई शहरापासून जवळ असलेल्या माकेगाव गावात काही दिवसांपूर्वी बिबट्याने बैलाचा फडशा पाडल्याची घटना घडली होती. या घटनेमुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या बिबट्याच्या भीतीने शेतकरी शेतात जाण्यासाठी देखील घाबरत आहेत. अशातच अंबाजोगाई ▶▶पान २ वर



### अफवा पसरवू नका

अंबाजोगाई परिसरात बिबट्याचा वावर दिसून आल्यानंतर सोशल मीडियावर या घटनेच्या अनुषंगाने इतरत्र ठिकाणचे जुने बिबट्याचे व्हिडीओ शेअर केले जात असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे कोणीही अशा अफवा किंवा व्हिडीओ शेअर करून नयेत, असे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे.

## खून व संघटित गुन्ह्यात एकाच वेळी १४ आरोपींना ठरविले दोषी

### जिल्हा न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

बीड, दि.५ (मराठवाडा पत्र न्युज):-शहरातील बहुचर्चित शिक्षक साजेद अनी खून प्रकरणात बीड येथील न्यायालयाने १८ पैकी १४ आरोपींना दोषी ठरवले आहे. या प्रकरणी आता सोमवार दि.९ डिसेंबर रोजी निकाल देणार असल्याचे कोर्टाने नमूद केले आहे. गुजर खान उर्फ अन्वर खान मिर्झा खान याच्यासह १४ जणांना दोषी ठरवत सरफराज अयाजओद्दीन काझी, फैज मोहम्मद खान आणि सय्यद नुर उर्फ मिना या तिघांना न्यायालयाने निर्दोष मुक्त केले आहे. दरम्यान कडेकोट पोलीस बंदोबस्तात सर्व आरोपींना न्यायालयात आणण्यात आले होते. या प्रकरणातील आरोपींवर मोक्का अंतर्गत गुन्हे दाखल असल्याने न्यायालय परिसरातही एक डीवायएसपी, चार पीआय यांच्यासह १५० पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा फौजफाटा तैनात करण्यात आला होता, केसशी संबंधीत व्यक्तींनाच आतमध्ये सोडण्यात आले होते. या प्रकरणाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले होते. बीड शहरातील बालेपीर भागात १९ सप्टेंबर २०१९ रोजी सैनिकी विद्यालयातीन शिक्षक सय्यद साजेद अली (वय ३८) यांची धारदार शस्त्राने हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात एकूण १८ आरोपींविरुध्द शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला होता. पोलीसांनी या प्रकरणाचा तपास करून दोषारोपत्र न्यायालयात दाखलकेले होते. सदरील प्रकरण जिल्हा न्यायालयातील विशेष न्यायाधीश सुरेखा पाटील यांच्या न्यायालयात सुरू होते. या प्रकरणी न्यायालयाने एकूण ४४ साक्षीदार तपासले तर बचाव पक्षातर्फे ५ साक्षीदार तपासण्यात आले. सदरील प्रकरणात फिर्यादी व साक्षीदार, ▶▶पान २ वर



### विशेष मोक्का न्यायालयाचा पहिलाच मोठा निकाल

बीड येथील बहुचर्चित साजेद अली खून प्रकरणात मोक्का अंतर्गत गुन्हे दाखल झालेले असल्याने सदरील प्रकरण बीडच्या विशेष मोक्का न्यायालयात चालवण्यात आले. आत्तापर्यंतच्या इतिहासात विशेष मोक्का न्यायालयाचा हा पहिलाच मोठा निकाल असुन तब्बल १४ जणांना दोषी ठरवण्यात आले आहे. ▶▶पान २ वर

### या १४ जणांना ठरवले दोषी

अन्वर खान उर्फ गुजर खान मिर्झा खान (रा. गुलशन नगर बालेपीर बीड), मुजीब खान मिर्झा खान पठाण, सय्यद नासेर सय्यद नुर, सय्यद शाहरूख सय्यद नुर, शेख उबेद शेखा बाबू, शेख सरफराजा उर्फ सरू डॉन, शेख शहेबाज शेख कलीम (रा. रोशनपुरा बीड), शेख अमर शेख अकबर (रा. गुलशन नगर बीड), ▶▶पान २ वर

## महावितरणच्या अनागोंदी कारभाराविरोधात रास्तारोको

### कमी दाबाने व वारंवार वीजपुरवठा खंडित रब्बी पिके धोक्यात-डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश, दि.५ (मराठवाडा पत्र न्युज):-बीड तालुक्यातील लिंबागणेश पंचक्रोशीतील गावांना विद्युत पुरवठा असणाऱ्या लिंबागणेश येथील ३३ केव्ही उपकेंद्रातील अनागोंदी कारभारामुळे विजेच्या समस्येने तिव्र रुप धारण केले असुन दिवसभरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने तसेच कमी दाबाचा वीजपुरवठा होत असल्याने मुबलक पाणी उपलब्ध असुनही वीजे अभावी शेताला पाणी देता येत नसल्याने रब्बी हंगामातील कांदा ज्वारी,गहु, हरभरा आदी पिके वाळु लागल्याने शेतकऱ्यांना हातची पिके वाया जाण्याची धास्ती असुन लिंबागणेश येथील ३३ केव्ही.उपकेंद्रातील उप अभियंता पद २ महिन्यांपासून रिक्त असुन लाईनमन वेळेवर ड्युटी करत नसल्याने तसेच मुख्यालयी रहात नसल्याने रात्री अपरात्री ग्रामस्थांना फ्युज टाकणे,केबल बदलणे आदी कामे करावी लागत असुन महावितरणच्या अनागोंदी कारभार विरोधात आज दि.५ सकाळी गुरुवार रोजी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली अहमदपूर ते अहमदनगर ५४८ डी राष्ट्रीय महामार्गावरील मांजरसुंभा ते पाटोदा दरम्यान लिंबागणेश बसस्थानक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. रास्तारोको आंदोलनामुळे काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. यावेळी सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे, मुळुकवाडीचे माजी सरपंच कृष्णा पितळे, मसेवाडीचे तुळशीराम काटकर इंयांची समायोजित भाषणे झाली. सावकारे एस.जी. उपकार्यकारी अभियंता महावितरण उपविभाग ग्रामीण बीड यांच्या लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. यावेळी निवेदन स्विकारताना पोलिस उपनिरीक्षक ▶▶पान २ वर



### लेखी आश्वासनानंतर आंदोलन मागे

उप कार्यकारी अभियंता महावितरण उप विभाग बीड ग्रामीण यांनी आंदोलनातील मागण्यांच्या अनुषंगाने लिंबागणेश येथील ३३ केव्ही.उपकेंद्रातील सहायक अभियंता रिक्त पदावर पदस्थापना. नियुक्तीसाठी वरीष्ठ स्तरावर पाठपुरावा केला आहे.लिंबागणेश व पोखरी ( घाट) गावच्या पाणीपुरवठा करण्यासाठी असलेल्या रोहित्रास जवळच्या ▶▶पान २ वर

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं लाडकी बहीण योजनेबाबत महत्त्वाचं वक्तव्य

# ''२१०० रुपये''

मुंबई, दि. ५ (वृत्तसेवा):- महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही वेळापूर्वीच पत्रकारांशी संवाद साधला आणि मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्याच पत्रकार परिषदेला संबोधित केलं. विधीमंडळ आणि मंत्रालय पत्रकार संघातर्फे देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तरंही दिली. लाडकी बहीण योजनेबाबत देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. लाडकी बहीण योजना आम्हीच सुरुच ठेवणार आहोत. तसंच २१०० रुपयेही आम्ही देणार आहोत. आता अर्थसंकल्पात त्याचा विचार आम्ही करु. आपले जे आर्थिक स्रोत चॅनलाईझ्ड झाल्यानंतरच हे करणं शक्य आहे. जी आश्वासनं दिली आहेत ती आश्वासनं ▶▶पान २ वर



# योगायोग आयोग!




महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर निवडणूक आयोग या यंत्रणेविषयी जो शंखनाद सुरू आहे त्यास पूर्णपणे आयोग जबाबदार ठरतो. न्याय नुसता करून चालत नाही; तो केला जात आहे असे इतरांस दिसणेही तितकेच आवश्यक असते असे न्यायपालिकेविषयी म्हटले जाते. न्यायदानातील नि:स्पृहता जितकी महत्त्वाची तितकेच न्यायदानाचे कर्तव्य करणाऱ्यांचे वर्तन नि:स्पृह आहे असे इतरांस दिसणे महत्त्वाचे असते; असा त्याचा अर्थ. तो निवडणूक आयोग या यंत्रणेसही तंतोतंत लागू पडतो. निवडणूक आयोग वास्तविक न्यायपालिकेप्रमाणे स्वतंत्र आणि सार्वभौम यंत्रणा आणि तिचे प्रमुख निवडणूक आयुक्त हे एक घटनात्मक पद. आपल्या देशात अशी घटनात्मक पदे हाताळणाऱ्यांस एक वेगळे संरक्षण असते. उदाहरणार्थ न्यायाधीश, निवडणूक आयुक्त वा राज्यपाल इत्यादी. या यंत्रणा ही सरकारी खाती नाहीत. तशी ती निदान कागदोपत्री तरी नसल्यामुळे त्यांना सत्ताधीशांपुढे झुकावे लागत नाही. त्यामुळे या घटनात्मक यंत्रणांतील व्यक्तींनी ताठ मानेने आपल्या जबाबदाऱ्यांचे निर्वहन करणे अपेक्षित असते. तथापि अलीकडे अनेक महत्त्वाच्या पदांवरील व्यक्तींचे वर्तन त्यांनी आपापले अधिकार कसे म्यान करून ठेवले आहेत हे दाखवून देणारे असते. अशा पदांवरील व्यक्तीदेखील सत्ताशरणतेत धन्यता मानताना दिसतात. सरन्यायाधीशपदावरून निवृत्त झाल्यानंतर एखादे आयते लोकप्रतिनिधित्व स्वीकारणे, राज्यपालपदावर समाधान मानणे वा मुख्य निवडणूक आयुक्ताने निवृत्तीनंतर क्रीडामंत्री होणे इत्यादी काही दाखले या संदर्भात देता येतील. यामुळे या सत्ताशरणांचे काय भले झाले ते झाले असेल. पण या अशांनी निरोगी लोकशाहीसाठी महत्त्वाच्या यंत्रणांची मात्र माती केली यात शंका नाही. निवडणूक आयोग ही यातील प्रतिष्ठेवर प्रश्नचिन्ह निर्माण झालेली एक यंत्रणा. महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालानंतर या यंत्रणेची छी-थू होत असेल तर त्याचे 'श्रेय' संपूर्णपणे याच यंत्रणेच्या पूर्वसुरींचे. त्यांच्या कृत्यांचे माप त्यांच्या पदरात टाकणे आवश्यक. याचे कारण विद्यमान निवडणूक आयोगाचे वर्तन या यंत्रणेच्या प्रतिष्ठेत भर घालणारे आहे असा दावा सत्ताधारीही करण्यास धजावणार नाहीत. या तीन सदस्यीय आयोगातील एका सदस्याच्या नियुक्तीसाठी निवडणूक आयोगाने दाखवलेल्या अतिउत्साहावर सर्वोच्च न्यायालयानेही प्रश्न निर्माण केले होते. तरीही आपले वर्तन कसे आहे इत्यादी विचार करण्याची गरज आयोगास वाटली नाही. गेल्या दोन वर्षांत खरे तर आपली नि:स्पृहता दाखवून देण्याची आणि आपल्या पाठीस कणा नामक अवयव असल्याचे सिद्ध करून दाखवण्याची संधी आयोगास अनेकदा मिळाली. पण आयोगाने त्याची माती केली. विशेषत: शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर, फुटलेल्या गटांनाच मूळ पक्ष ठरवण्याची आयोगाची आततायी कृती आयोग नेमका कोणासाठी काम करतो असा प्रश्न निर्माण करणारी होती. सर्वोच्च न्यायालयाने त्या आधी विधिमंडळ पक्ष आणि पक्ष संघटना यांतील फरक स्पष्ट केला होता आणि तरीही आयोगाने त्याकडे दुर्लक्ष करत सत्ताधाऱ्यांस जे हवे होते ते केले. आमचा निर्णय आणि सत्ताधाऱ्यांचे हित हा केवळ योगायोग होता, असा साळसूद खुलासा आयोग करू शकतो. तसा तो करेलही. पण त्यावरून या मंडळीचे सराईतपण तेवढे दिसून येईल. कारण असे योगायोग सद्या:स्थितीत अनेक घडताना दिसतात. उदाहरणार्थ लोकसभा निवडणुका सात टप्प्यात घेणे, त्याचवेळी महाराष्ट्रातील मतदानही अनेक फेऱ्यांत ठेवणे आणि राज्यातून फक्त ४८ लोकसभा सदस्यांसाठीचे मतदान एका फेरीत न घेऊ शकणाऱ्या आयोगास अवघ्या चार महिन्यांत २८८ उमेदवार एकाच फेरीत मतास घेण्याचा आत्मविश्वास येणे अथवा हरयाणा आणि महाराष्ट्र राज्यांतील विधानसभा निवडणुकांत जमेल तितके अंतर राहील याची खबरदारी घेणे ही आयोगाच्या 'नि:स्पृह' कारभाराची काही ताजी उदाहरणे. या प्रत्येकामागे एक योगायोग दडलेला आहे. जसे की लोकसभा निवडणुका सात टप्प्यांत घेण्याच्या निर्णयामागे '४०० पार'चा नारा देणाऱ्या आणि तसा आत्मविश्वास असणाऱ्या नेत्यांस सर्वत्र प्रचारासाठी पुरेसा वेळ मिळण्याचा योगायोग. महाराष्ट्रातही ४८ जागांसाठीचे मतदान अशा टप्प्याटप्प्याने घेण्यामागे सुरक्षा यंत्रणांवरील ताण हा योगायोग. तसेच जितके टप्पे अधिक तितका सत्ताधीशांचे मताधिक्य घटण्याचा वेग अधिक हे लक्षात आल्यानंतर २८८ जागांसाठीचे मतदान एकाच फेरीत घेऊन टाकण्याचा योगायोग इत्यादी. वास्तविक याच आयोगाच्या पूर्वसुरींनी शिवसेनेचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांचा मताधिकार काढून घेण्याची आणि त्याआधी न्यायालयाने शिवसेनेचे उमेदवार डॉ रमेश प्रभु यांची निवडणूक रद्दबातल करण्याची हिंमत दाखवली होती. हा फार जुना इतिहास नाही. त्यामागील कारण होते शिवसेनाप्रमुखांनी निवडणूक प्रचारात घेतलेला धर्माचा आधार. पण आपल्याच पूर्वसुरींच्या कृत्याचा विसर विद्यमान निवडणूक आयोगास नंतर अनेकदा झाला, हाही तसा योगायोगच. कारण अलीकडे तर निवडणुकांत उघडउघडपणे धर्मभावना भडकवणारी विधाने केली जातात आणि सर्वोच्च सत्ताधीशही त्यात मागे नसतात. पण अलीकडच्या निवडणूक आयोगाच्या कानी काही पडत नाही आणि दृष्टीनेही ते बहुधा दिव्यांगच असावेत, हाही योगायोगच. कारण या मुद्द्यांवर आयोगाने कोणावर काही कारवाई केल्याचे उदाहरण नाही. तसेच विरोधकांविरोधात आचारसंहिता भंगाच्या तक्रारी सत्ताधाऱ्यांकडून आल्यास त्याची दखल घेण्यात जी त्वरा आयोग दाखवतो ती विरोधी पक्षीयांच्या तक्रारींबाबत दिसत नसेल तर त्यामागेही योगायोग याखेरीज अन्य काही कारण नसणार. या योगायोगांस नागरिक आणि राजकीय पक्ष सरावलेले असूनसुद्धा मतदानातील गैरव्यवहार वा मतदान यंत्रांतील कथित फेरफार यावर विरोधी पक्षीयांकडून आरोप केले जात असतील तर तो मात्र खचितच योगायोग नाही. त्यामागील कारण लक्षात घ्यायला हवे. कारण यावेळी निवडणुकीत कोणतीही लाट नव्हती. तरीही लाटेतील निवडणुकांपेक्षा अधिक एकतर्फी मतदान झालेले असल्याने विरोधकांनी त्याबाबत संशय घेणे अतर्क्य नाही. या निवडणुकीतील विजेता पक्षदेखील या विजयाच्या आकाराने चमकून गेला असेल तर पराभूत विरोधकांस बसलेला धक्का नैसर्गिकच ठरतो. हा संशय त्यामुळे जसा 'वाढीव' मतदानाचा असू शकतो तसाच मतदान यंत्रांबाबतही तो असणे गैर नाही. अशावेळी आयोगाने तो किती खरा, किती खोटा हे सिद्ध करून दाखवण्याची जबाबदारी स्वत:हून घ्यायला हवी. तेवढा पोक्त मोठेपणा आयोगाने दाखवायला हवा. नियामक यंत्रणांचे खांदे रुंद असावे लागतात आणि हृदय विशाल असावे लागते. रुंद खांद्यावर नियमनाची नैतिक जबाबदारी असते आणि विशाल हृदय टीका सामावून घेण्यासाठी आवश्यक असते. सध्या फक्त निवडणूक आयोगच काय, सगळ्याच नियामक यंत्रणांचे घोडे पेंड खायला जाते ते याच मुद्द्यावर. या नियामकांचे शील हाच खरा काळजीचा विषय. त्यास तडा गेलेला असल्यामुळे या आयोगाविषयी असे प्रश्न निर्माण होतात आणि आयोगाच्या कामगिरीबाबत अनेकांस शंका येते. प्रामाणिकपणा, नि:स्पृहता ही एकदाच सिद्ध करून आयुष्यभर मिरवण्याची गोष्ट नाही. सुदृढ शरीरासाठी जसा व्यायाम एकदाच करून चालत नाही; त्यात नियमितपणा लागतो, तसेच हे. हे कष्ट कसे नियमितपणे उपसावे लागतात हे टी. एन. शेषन यांच्यासारख्यांनी दाखवून दिलेले आहे. ते १९९० ते १९९६ या काळात मुख्य निवडणूक आयुक्त होते. म्हणजे आज सव्वादोन तपानंतरही सर्वांस फक्त शेषन यांचेच स्मरण होत असेल तर तो काही योगायोग खचितच नव्हे. यात बदल झाला नाही आणि निवडणूक आयोग फक्त योगायोग आयोगच राहिला तर ते लोकशाहीच्या गळ्यास नख लावणे असेल, हे निश्चित.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी शपथ घेताच गेवराईत आनंदोत्सव साजरा

# माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्या कार्यालयावर पुन्हा "कमळ" फुलले

गेवराई, दि. ५ (मराठवाडा पत्र न्युज):- विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपा महायुतीला घवघवीत यश मिळाले असून भाजपच्या विधीमंडळ गटनेते देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची घोषणा होवून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेताच भाजपचे बंडखोर नेते माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्या समर्थकांनी आनंदोत्सव साजरा करुन माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्या कार्यालयावर पुन्हा भारतीय जनता पार्टी, संपर्क कार्यालय असा बोर्ड लावला असून यामुळे त्यांच्या कार्यालयावर पुन्हा एकदा कमळ फुलल्याचे चित्र पहायला मिळाले.गेवराई विधानसभेच्या निवडणूकीत बीडच्या भाजपश्रेष्ठीवर आणि जिल्ह्याचे पालकमंत्र्यावर आरोप करत आपण भाजप पक्षाकडून निवडणूक लढणार नसल्याचे जाहीर करत अपक्ष निवडणूक लढविणारे भाजपकडून दोन पंचवार्षिक आमदार राहीलेले लक्ष्मण पवार यांनी गेवराई शहरातील संपर्क कार्यालयावर पुन्हा कमळ फुलवल्याचे चित्र



पहावयास मिळाले आहे. विधानसभा निवडणुक प्रचार दरम्यान मी पून्हा भाजपात जाणार नाही असे ठोकपणे सांगणा-या लक्ष्मण पवारांनी मुंबई येथील सागर बंगल्यावर देवेंद्र फडणवीस यांची नुकतीच भेट घेतली असल्याचा फोटो देखील सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यामुळे पवारांच्या राजकीय पुनर्वसनाची चर्चा सद्या मतदार संघात होत आहे. दरम्यान राज्यात महायुतीला यश मिळाले असून ङ्गदेशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी, यांच्या अनेक राज्याचे मुख्यमंत्री तसेच केंद्रीय मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते.महायुती सरकारच्या शपथ विधीचा लाईव्ह कार्यक्रमाचे आ.लक्ष्मण पवारांच्या संपर्क कार्यालयात आयोजन करण्यात आले होते यावेळी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथग्रहण सुरु असतांना गेवराई भाजपा कार्यालयात पेढे वाटून फटाके फोडून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी नागरिकांसह कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थिती होते.

# धानोरा खुर्द येथे जागतिक मृदा दिन उत्साहात साजरा

## जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी पालापाचोळा शेतातच कुजवा : शिवप्रसाद येळकर

अंबाजोगाई, दि. ५ (मराठवाडा पत्र न्युज):-५ डिसेंबर जागतिक मृदा दिनाचे औचीत्य साधुन मृदेतील जैवविविधता रक्षणाकरिता नॅचरल शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड रांजणी, नेचर केअर फर्टीलायझर व कृषी विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील धानोरा खुर्द येथे जमीन आरोग्य व्यवस्थापन प्रशिक्षण व शेतीशाळा घेऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कृषी विभागाचे मंडळ कृषी अधिकारी विजयकुमार पवार यांनी माती परीक्षण व त्याचे महत्त्व संदर्भात विस्तृतपणे माहिती दिली. नेचर केअर कंपनीचे जिल्हा व्यवस्थापक बालाजी जाधव व प्रक्षेत्र अधिकारी विवेकानंद शितोळे यांनी केळी पिकामध्ये अन्नद्रव्य व्यवस्थापन बाबत माहिती दिली. कृषी सहायक पंडित काकडे यांनी हरभरा, तूर पिकाचे कीड रोग व्यवस्थापन बाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक तथा नॅचरल शुगरचे ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद रामप्रसाद येळकर यांनी जागतिक मृदा दिनाचे महत्त्व सांगून या वर्षीच्या थिमनुसार जमिनीची काळजी घेण्यासाठी मातीच्या मोजमाप, निरीक्षण आणि व्यवस्थापनाला प्राधान्य देऊन, अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी आणि पर्यावरणीय आरोग्याचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक शाश्वत पद्धती अवलंबन्या संदर्भात माहिती दिली. येळकर यांनी आरोग्य पत्रिकेवर आधारित खत व्यवस्थापनाची माहिती देऊन मृदा आरोग्यामध्ये सेंद्रिय खतांचे महत्व, माती व पाणी नमुना घेतानाच्या तांत्रिक बाबी समजावून सांगून दर तीन वर्षांनी माती परीक्षण करणे आवश्यक आहे बाबत माहिती दिली, शेतातील काडीकचर्याचे सेंद्रिय खतामध्ये रूपांतर करण्याच्या पद्धती, पिकाच्या अवशेषांमध्ये सुप्त अवस्थेमधील अळी नियंत्रण करण्यासाठी जैविक परोपजीवी बुरशी मेटारायझियम ॲनिसोप्लीचा वापर करण्यासंदर्भात माहिती दिली. पूर्व हंगामी ऊस लागवड खत नियोजन, बेणे प्रक्रिया तसेच खोडवा उसाचे व्यवस्थापन व पाचट कुजवण्याबाबत माहिती



दिली. शेतीमधील उत्पादन खर्च कमी करण्यासाठी व जमिनीचे आरोग्य अबाधित ठेवण्यासाठी शून्य मशागत तंत्रज्ञान फायदेशीर आहे याची माहिती देऊन शून्य मशागत तंत्रज्ञानामधील विविध टप्पे विस्तृतपणे समजावून सांगितले. नॅचरल शुगरच्या माध्यमातून माफक दरामध्ये नॅचरल ऑरगॅनिक फर्टीलायझर या भू-सुधारकाचा वापर करण्यासंदर्भात माहिती येळकर यांनी दिली. कार्यक्रमामध्ये नॅचरल शुगरच्या माध्यमातून दाजीसाहेब शितोळे, हरिश्चंद्र शितोळे या शेतकऱ्यांना प्रातिनिधिक मृदा आरोग्य तपासणी अहवाल वितरित करण्यात आले. प्रगतिशील शेतकरी पोपट शितोळे यांनी पाचट ठेवल्यामुळे झालेले फायदे बाबत त्यांचे अनुभव कथन केले. यावेळी सरपंच बालासाहेब गुणाले, कृषी विभागाचे कृषी पर्यवेक्षक माचवे, निलेवाड, राठोड, नॅचरल शुगरचे कृषी पर्यवेक्षक स्वप्निल खोसे अनिकेत पाटील व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### असे करा खोडवा ऊस व पाचट व्यवस्थापन

ट्रॅक्टरचलित पाचट कुट्टी यंत्र उपलब्ध असल्यास त्या यंत्राच्या सहाय्याने पाचटाची कुट्टी करावी. कुट्टी यंत्र उपलब्ध नसल्यास, ऊस तुटून गेल्यावर पाचट सरीमध्ये एकसारखे पसरावे. आंतरमशागत करून मोकाट पाणी द्यायचे असल्यास प्रत्येक सरीआड पाचट जमा करावे, ज्या सरीत पाचट नाही तेथे आंतरमशागत करता येते.पाचटाचे आच्छादन केल्यानंतर किंवा कुट्टी केल्यानंतर ऊसाच्या बुडख्यावर पडलेले पाचट बाजूला करून बुडखे मोकळे करावे. ऊसाचे बुडखे उंच राहिल्यास ते जमिनीलगत कोयत्याने किंवा ट्रॅक्टरचलित बुडखे छाटणी यंत्राने छाटून घ्यावेत. रोग व किडीचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून ऊसाच्या बुंध्यावर कार्बेन्डाझिम ५० % डब्ल्यू पी १० ग्रॅम व मॅलेथीऑन ५० % ईसी २५ मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पाचट कुजवणाऱ्या जिवाणूंची क्रिया जलदगतीने होण्यासाठी स्प्रिंकलरच्या सहाय्याने पाणी द्यावे. पाचटाचे कर्ब:नत्र गुणोत्तर २४:१ च्या जवळ आणण्यासाठी उसाच्या पाचटातील नत्राचे प्रमाण वाढवले पाहिजे, त्यासाठी पाचटावर एकरी ८० किलो युरिया, १०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट खत पसरवून टाकावे. पाचट कुजण्याची क्रिया जलदगतीने होण्यासाठी जिवाणू संवर्धक वेस्ट डीकंपोजर कल्चर कृषी विज्ञान केंद्र डिघोळ अंबा किंवा मानवलोक येथून घेऊन २०० लिटर पाण्यात मिसळावे त्यामध्ये दोन किलो गुळ मिसळावा, पाच ते सहा दिवसांनी तयार झालेले २०० लिटर वेस्ट डीकंपोजर द्रावण फवाऱ्याच्या सहाय्याने पाचटावर फवारावे. - शिवप्रसाद येळकर, ऊस विकास अधिकारी, नॅचरल शुगर रांजणी.

# डेप्युटी सीईओ केकान यांची बदली



**जिल्हा परिषदेच्या वतीने निरोप**

बीड दि.५ (मराठवाडा पत्र न्युज):-बीड जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण विभागाचे जिल्हा बालविकास अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर केकान यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी ङ्गसंपल्यामुळे त्यांची मुंबई येथे बदली झाली आहे. केकान यांना बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांनी कार्यमुक्त केले. बीड येथील कार्यकाळ संपल्यामुळे त्यांना जिल्हा परिषदेच्या वतीने दि. ४ डिसेंबर २०२४ रोजी भावपूर्ण निरोप देण्यात आला.बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जीवने यांनी चंद्रशेखर केकान यांचा सत्कार करून भावपूर्ण निरोप देण्यात आला.यावेळी आदित्य जीवने यांनी चंद्रशेखर केकान यांनी महिला आणि बालकल्याण विभागाचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून उल्लेखनीय कार्य केल्याचे गौरवोद्गार काढले. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळुंके, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य नदाफ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ उल्हास गंडाळ, जेष्ठ अधिव्याख्याता डॉ. विक्रम सारूक, यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

## पान १ वरून

### महाराष्ट्र राज्यात...

मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत शपथविधी सोहळा पार पडला. या शपथविधी सोहळ्याला महायुतीचे राज्यभरातील समर्थक, कार्यकर्ते उपस्थित होते. सिनेसृष्टीमधील दिग्गजांनी देखील या सोहळ्याला हजेरी लावली. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीनं २८८ पैकी २३६ जागांवर विजय मिळवला. भाजपला १३२, शिवसेनेला ५७ आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला ४१ जागा मिळाल्या. महायुतीच्या सरकारचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी तिसऱ्यांदा शपथ घेतली आहे. २०१४-२०१९ या कालावधीत त्यांनी पहिल्यांदा राज्याचं मुख्यमंत्रिपद भूषवलं. २०१९ मध्ये भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या सरकारचे ते ७२ तासांसाठी मुख्यमंत्री होते. त्यानंतर आज ते तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले आहेत.

### एकनाथ शिंदे...

देत आणि शिवसेनेच्या आमदारांची मागणी मान्य करत एकनाथ शिंदे यांनी सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला. २०१४-२०१९ या काळात प्रथम महाराष्ट्राचे विरोधी पक्षनेते, त्यानंतर राज्य सरकारमध्ये नगरविकास खात्याचे मंत्री म्हणून त्यांनी काम केलं. एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंच्या सरकारमध्ये देखील ते नगरविकास मंत्री होते. यानंतर शिवसेना आणि भाजपचं सरकार स्थापन झालं तेव्हा एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होते. देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमध्ये ते उपमुख्यमंत्री झाले आहेत.

### अजित पवार...

झाले होते. आज त्यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारमध्ये दुसऱ्यांदा उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.

### कुत्र्यांनी पाडला...

शहरापासून जवळ असलेल्या कुंबेफळ गावात एका हरणाचा फडशा पाडल्याची घटना उघडकीस आली. त्यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. या घटनेमुळे कुंबेफळ परिसरातील ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. परंतू, 'त्या' हरणाचा फडशा मोकाट कुत्र्याने पाडला असल्याची माहिती वनविभागाकडून देण्यात आली आहे.

### खून व संघटित गुन्हयात...

इतर परिस्थितीजन्य पुरावा, वैद्यकीय पुरावा, न्याय वैद्य प्रयोग शाळा यांचा अहवाल तसेच सहाय्यक सरकारी वकील ॲड. अजय श्रीमंतराव तांदळे यांचा युक्तीवाद बाह्य धरून जिल्हा व सत्र न्यायाधीश ? तथा विशेष मोक्का न्यायाधीश श्रीमती एस. आर. पाटील यांनी गुजर खान सह १४ जणांना दोषी ठरवले तर तिघांची निर्दोष मुक्तता केली. याप्रकरणी सरकार पक्षातर्फे विशेष सरकारी वकील अड अजय तांदळे यांनी काम पाहिले. त्यांना जिल्हा सरकारी वकिल तथा शासकीय अभियोक्ता ॲड. अजय राख यांनी मार्गदर्शन केले व सर्व सहाय्यक वकिल यांचे सहकार्य लाभले. सदर प्रकरणात पैरवी अधिकारी पीएसआय बी.व्ही. जायभाये यांनी त्यांना सहकार्य केले.

### विशेष मोक्का न्यायालयाचा

त्यामुळे न्यायालयाने दिलेला निकाल महत्वाचा ठरला असुन आता मोक्का न्यायालय सोमवार दि.९ डिसेंबर रोजी काय निकाल देते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### या १४ जणांना...

शेख शेख बबर शेख युसूफ (रा. खासबाग बीड), आवेज काझी (रा. काझी नगर बालेपीर बीड), शेख इमान उर्फ काला शेख रशीद (रा. काझी नगर बालेपीर बीड), शेख मझहर उर्फ काल्या उर्फ हाफ मर्डर शेख रहीम (रा. बांगर नाला बीड), बबर खान गुल मोहम्मद खान पठाण (रा. शहेबाज कॉलनी नेकनूर), शेख वसीम शेख वुन्हानोद्दीन (रा. रोशनपुरा बालेपीर बीड) या चौदा जणांना दोषी ठरवले आहे. या प्रकरणात एकूण १८ जणांविरुध्द गुन्हा दाखल झालेला असुन त्यापैकी सतरा जण अटक असुन इमान पठाण उर्फ चड्डा हा फरार आहे.

### महावितरणच्या अनागोंदी...

आप्पासाहेब रोकडे, मंडळ अधिकारी अशोक डरपे,पो.हे. संतोष राऊत, बाबासाहेब डोंगरे, नवनाथ मुंढे , मधुकर तांदळे, इसाक शेख, उबाळे, कुलकर्णी उपस्थित होते. आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, राजाभाऊ गिरे, विक्रांत वाणी, सुरेश निर्मळ,रमेश पाटील विनायक मोरे, पांडुरंग वाणी, अँड.गणेश वाणी,कृष्णा पितळे, सय्यद बशीर, औदुंबर नाईकवाडे, बोरखेडचे आरुण काकडे, विनायक शिंदे, निळकंठ काकडे , आजिनाथ घरत, शिवाजी घरत, साहेबराव घरत, विश्वंभर गिरी,अशोक जाधव, संतोष भोसले, सहभागी होते.

### लेखी आश्वासनानंतर...

११ केव्ही वाहिनीपासुन तातडीने सर्वे करून अंदाज पत्रक मंजुरीसाठी वरीष्ठ कार्यालयास सादर करण्यात आले आहे. सद्यस्थितीत कृषी वाहिनीवर लोड वाढल्याने चक्राकार पद्धतीने विद्युत पुरवठा करण्यात येत आहे. लिंबागणेश गावातील दुरूस्ती व केबल व कट आऊट दुरुस्ती करण्याचे आदेश दिले आहेत. लिंबागणेश येथील विद्युत कर्मचारी यांचा अपघात झाल्याने सद्यस्थितीत अन्य कर्मचाऱ्यांना देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी देण्यात आली असल्याचे लेखी दिल्यानंतर रास्ता रोको आंदोलन मागे घेण्यात आले.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस...

पूर्ण करु त्याकरिता ज्या व्यवस्था करायच्या आहेत त्या आम्ही आधी करणार आहोत. स्क्रुटिनी म्हणजेच पडताळणीचा जोपर्यंत प्रश्न आहे त्यात इतकंच आहे की निकषांबाहेर जर कुणी घेतलं असेल किंवा काही तक्रारी आल्या आहेत त्यावर आमचं लक्ष असेल. शेतकरी सन्मान योजना जेव्हा पंतप्रधान मोदींनी सुरु केली तेव्हा पहिल्या टप्प्यात असं कळलं की काही मोठ्या शेतकऱ्यांनाही ते मिळालं आहे. त्यानंतर अनेक शेतकऱ्यांनी स्वतःच सांगितलं की आम्ही निकषात बसत नाही. अशाच पद्धतीने लाडकी बहीण योजनेत निकषांच्या बाहेरच्या काही बहिणी मिळाल्या तर त्याचा पुनर्विचार होईल पण सरसकट पुनर्विचार केला जाणार नाही. असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

# असंघटित कामगार यांच्यासाठी पुस्तक अनावरण कार्यक्रम

बीड, दि.५ (मराठवाडा पत्र न्युज): - कार्यक्रमाचे उद्घाटक आनंद एल.यावलकर, अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड यांनी केले. सदर कार्यक्रमास शिवकुमार स्वामी, प्र.जिल्हा दंडाधिकारी, बीड, आय.जे.एम.चे ब्रिट्टो मायकल नदार व त्यांचे सहकारी उपस्थित होते. जी.जी.सोनी, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड व जिल्हा महिला व बाल विकासाचे फारूख, वकील विकास बडे, सचिव सुहास पालीमकर, अधिकार मित्र तत्वशिल कांबळे, मिथुन जोगदंड आणि अशोक तांगडे हे उपस्थित होते. आनंद एल.यावलकर यांनी मार्गदर्शनपर बोलताना म्हणाले कि, असंघटित कामगार म्हणजे असे कामगार जे औपचारिक किंवा नोंदणीकृत श्रमिक संघटनामध्ये सदस्य नसतात आणि ज्यांचे कामगार हक्क आणि अधिकार विविध औपचारिक कायदेशीर संरचानांव्दारे संरक्षित केलेले नसतात. या प्रकारच्या कामगारांमध्ये घरकामगार, शेतमजूर, छोटया-मोठया कारखांन्यांमधील कामगार, विक्रेते, मजूर, वाहनचालक इत्यांदींचा समावेश होतो. असंघटित कामगांराच्या कामाचे स्थिरता, वेतनाचे हक्क, सुरक्षा आणि सामाजिक संरक्षण यामध्ये मर्यादा येतात. या कामगारांना कामाच्या ठिकाणी विविध समस्या येउ शकतात, जसे की, कामाचे शोशण, अल्प वेतन, कामाच्यास शर्ती व सुरक्षा न पाळणे, आरोग्य व सुरक्षा उपाययोजना नसणे इत्यांदी. यासाठी त्यांना कायदेशीर मदत व मार्गदर्शन आवश्यक असते, ज्यामूळे ते आपल्या हक्कांना समजून घेउन संरक्षण मिळवू शकतात.तद्नंतर ॲड. तृप्ती पाटील यांनी मानवी तस्करी व वेठबिगारी कायदा यावर सर्वांना सविस्तर मार्गदर्शन केले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com



भारतीय लॉकदैवत जेजुरी खंडोबा देवाच्या चंपाषष्ठी उत्सवा निमित्त जेजुरी गड मंदिराला आकर्षण अशी विद्युत रोषणाई केल्याने संपूर्ण परिसर झगमगुन गेला होता हा उत्सव राज्यासह आंध्र, कर्नाटका मध्यप्रदेश छतीस गड मधील खंडोबा मंदिरातही साजरा केला जातो (फोटो– विजयकुमार हरिश्चंद्रे)

# बाहुबली देवाभाऊ तुम आगे बडो घोषणाबाजी, डीजे वाद्य आणि भव्य रॅलीने आष्टी शहर दणाणले

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून गुरुवारी सायंकाळी देवेंद्रजी फडणवीस यांचा दिमाखदार शपथविधी सोहळा पार पडला या सोहळ्याचे आष्टी शहरतील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आ.सुरेश धस समर्थकांनी मोठ्या स्क्रीन वर दाखविला. त्यानंतर आनंदोत्सव साजरा करत शहर शहर फटाकांच्या अतीषबाजूने आणि घोषणांनी दणाणून सोडले.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून गुरुवारी सायंकाळी आझाद मैदान मुंबई येथे मोठा दिमाखदार शपतविधी सोहळा संपन्न झाला. या शपथविधी सोहळ्याची आष्टी शहरात देखील जय्यत तयारी भाजपा आ. सुरेश धस यांच्या कार्यकर्त्यांकडून करण्यात आली होती. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मोठ्या स्क्रीनवर हा शपथविधी सोहळा दाखविण्यात आला. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेताच फटाक्यांची आतिशबाजी करण्यात आली. त्यानंतर आष्टी शहरातून डीजे वाद्यासह भव्य विजयोत्सव रॅली काढण्यात आली.रॅलीत बाहुबली देवाभाऊ तुम आगे बडो हम तुम्हारे साथ है,भारतीय जनता पार्टीचा विजय असो यासह घोषणांनी संपूर्ण शहर दुमदुमून गेले.यावेळी कार्यकर्त्यांनी हातात देवेंद्र फडणवीस यांचे पोस्टर घेत देवा भाऊ या गीतासह विविध गाण्यांवर ठेका धरत कार्यकर्त्यांनी आनंद उत्सव साजरा केला.

# गडचिरोली येथे अशोक सुर्यवंशी यांना महाराष्ट्र सन्मान आयकॉन पुरस्कार प्राप्त



गडचिरोली । प्रतिनिधी

यहोवा यिरे फौंडेशन कला जिवन बहुउद्देशीय संस्था चंद्रपुर नागपुर गडचिरोली संस्थापक अध्यक्ष मा श्री डॉ. रमेश बुरकुटे संस्थापक अध्या यांच्या कडुन देण्यात येणारा महाराष्ट्र सन्मान आयकॉन २०२५ चा पुरस्कार प्रमुख उपस्थितीत पाहुणे महेद्र चव्हाण सौ. शिल्पा शाहीर चिफ गेस्ट ,(स्टार लावनी साम्राज्ञी नृत्यांगना, अभिनेत्री), डॉ. रमेश मुरकुटे आयोजक संस्थापक अध्यक्ष आणि , एलिजा बुरकुटे (आयोजिका) या प्रमुख उपस्थितीत पाहुण्यानच्या हस्ते महाराष्ट्र आयकॉन २०२४ पुरस्कार अशोक सुर्यवंशी यांना देण्यात आला. अशोक सुर्यवंशी यांनीकलाक्षेत्रात१९९५ पासुन कला क्षेत्रात सुरुवात केली आहे चित्रपट टिव्ही मालिका नाट्य क्षेत्रात आपल्या कलेचा वारसा जोपासना करत आहेत.

गुरुजी चित्रपटात व्हिलनची भुमिका साकारली आहे कृष्णनिती या चित्रपटात निर्मिती व्येवस्थापक म्हणून काम पाहीले आहे* तसेच *परतफेड अस्तित्व ब्लॅकमेल हट्ट, झुंजवेली या लघुफटाची निर्मिती करुन या लघुपटांना पारीतोषिक मिळवले आहे. सांगली कोल्हापूर महापुराच्या वेळी पाण्यात थांबुन लोकांना मद्दत कार्य केले आहे तसेच जिल्ह्यातील स्थानिक कलाकारांना ४० टक्के काम मिळावे म्हणुन जिल्ह्याचे पालक मंत्री जयंत पाटील व जिल्हाधिकारी चौधरी यांना निर्माता महामंडळ यांच्या कडून निवेदन देवुन कलाकारांना कलेचा हक्क दिला व जयप्रभा स्टुडिओ बचाव कार्यासाठी आंदोलनात वेगवेगळ्या पध्दतीने आदोलन करुन जयप्रभा स्टुडिओला कलाकारांना शुटींग व्हावे यासाठी आंदोलन करुन मद्दत कार्य केले आहे आहे. सुर्यवंशी राज्य स्तरीय,आंतर राष्ट्रीय कला गौरव, आंतराराष्ट्रीय भारत भुषण,भारत सन्मान गौरव पुरस्कार वर्ल्ड इंटर नॅशनल पार्लमेंट पुरस्कार, आयकॉन पुरस्कार मिळवले आहे. शालिय मुलांना वह्या वाटप करुन समाज सेवा करत आहेत ते इंडीयन पोलीस मित्र आहेत म्हणून आयकॉन पुरस्काराचे आयोजकांने त्यांच्या कामाची दख्खल घेऊन सुर्यवंशी यांना कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार मिळाला.

# नारळ पीक कार्यशाळा संपन्न




परभणी । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत कार्यरत कृषी विज्ञान केंद्र खामगाव येथे मा. कुलगुरू व मा. संचालक विस्तार शिक्षण वनामकृवी, परभणी यांच्या मार्गदर्शनाखाली नारळ पीक कार्यशाळा गुरुवार दि.०५/१२/२०२४ रोजी संपन्न झाली. कृषी विज्ञान केंद्र खामगाव, बीड– खख व नारळ विकास बोर्ड, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कृषी विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दीप्ती पाटगावकर, नारळ विकास बोर्ड ठाणे येथील उपसंचालक डॉ. रवींद्र कुमार, तांत्रिक अधिकारी श्री.विपिन पी., खामगाव गावचे सरपंच मा.धोंडीराम डींगरे , गेवराई तालुक्याचे तालुका कृषी अधिकारी श्री अभय वडकुते, प्रगतशील शेतकरी श्री. राका साहेब इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमा प्रसंगी शास्त्रीय पद्धतीने नारळ लागवड तंत्रज्ञान विषयक शेतकऱ्यांना सविस्तर असे मार्गदर्शन करण्यात आले . तसेच कृषी विज्ञान केंद्र, खामगाव मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा शेतकऱ्यांनी फायदा घ्यावा असे आवाहन करण्यात आले. नारळ विकास बोर्ड , ठाणे चे तांत्रिक अधिकारी श्री विपिन यांनी रोपे खात्रीशीर व शासकीय नर्सरी करूनच घ्यावेत यावर प्रकाश टाकला .कार्यक्रम समन्वयक डॉ. दीप्ती पाटगावकर यांनी नारळाम धील काढणीपश्चात तंत्रज्ञान व प्रक्रिया उद्योग याविषयी सखोल असे मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कृषी विज्ञान केंद्र येथील शास्त्रज्ञ प्रा. किशोर जगताप, डॉ. तूकेश सुरपाम, तसेच इतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. या कार्यक्रमास कार्यक्षेत्रातील मोठे संख्याने शेतकरी उपस्थित होते .

विश्वरत्न महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या विश्वव्यापी कार्याचा सुक्ष्म आढावा

# आदरांजली भिमरायाला... भावांजली विश्वरत्नाला

**● करोडो भारतीयांच्या जीवनमानात आमूलाग्र बदल घडवून आणणार्या नेत्यांमध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्थान विश्वस्तरीय आहे. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर मात करून कोटी–कोटी भारतीयांचे अंधकारमय जीवन लक्ष–लक्ष किरणांनी प्रकाशित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर द्वारा लिखित भारतीय राज्यघटनेमुळे आज भारत देश एकात्मिक,अखंड असुन भारत देश एक संघ आहे तसेच राज्यघटनेतील तरतुदीमुळेच भारतात कधीही हुकूमशाही आली नाही. बाबासाहेबांनी प्रत्येक भारतीयांच्या विकासासाठी समान संधी आणि मुलभूत अधिकार देवून देशाला प्रगतीपथावर नेण्यात मोलाचा वाटा उचलला आहे.**

राज्यघटनेतील मूलभूत हक्क,कर्तव्ये, त्रिस्तरीय पंचायत राज मधून सर्वसामान्यांना सत्तेत सहभागीत्व, वंचितांना संधीची उपलब्धता, राज्य आणि केंद्र यामधील सुयोग्य समन्वय ही राज्यघटनेची उपायुक्तता वाढविणारी आहेत.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राज्यघटनेतील कायदा व सुव्यवस्था राखणाऱ्या कलमांमुळेच देशात शांतता आणि सुरक्षितता आहे,अन्यथा विविध धर्मीय–जातीय–पंथीय मतभिन्नता असलेला देश केंव्हाच सीरिया प्रमाणे अराजक,अफगाणिस्थान प्रमाणे तालिबानी झाला असता.आपल्या देशात अराजकता निर्माण झाल्यास देशात किती भयावह स्थिती निर्माण होईल,याचा विचारही गर्भगिळीत करणारा वाटतो.देशात शांतता, सुरक्षितता आणि अखंडता कायम आहे ती विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानामुळेच! सामाजिक जीवनात २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारिणी सभा ,१९२७ रोजी चवदार तळ्याचा सत्याग्रह ,१९३०रोजी नाशिकच्या काळाराम मंदिर सत्याग्रहातून अस्पृश्यांमध्ये स्वसन्मानाची ज्योत जागवली.बाबासाहेबांनी ८ जुलै १९४५ रोजी पिपल्स एज्युकेशन सोसायटी ची स्थापन करून करोडो बहुजनांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. १५ ऑगस्ट १९३६ रोजी स्वतंत्र मजुर पक्ष ,१९ जुलै १९४२ रोजी शेड्यूल कास्ट फेडरशन आणि १९५५ ला प्रस्तावित रिपब्लिकन पक्षाद्वारे राजकीय क्षेत्रात पायाभरणी केली.१४ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या लाखो अनुयायांसह धर्मांतर करताना बाबासाहेबांनी समतावादी , मानवतावादी ,विज्ञानवादी बौद्ध धम्म भारतात पुर्नस्थापित करून देशातील संभाव्य धार्मिक यादवी टाळली. भारतीय अर्थव्यवस्थेला मार्गदर्शक ठरणारे अर्थशास्त्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते हे आज आपल्या लक्षात आले पाहिजे तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजनांच्या–स्त्रीयांच्या हक्कासाठी १९५२ साली आपला कायदेमंत्री पदाचा राजीनामा देणारे डॉ बाबासाहेबच होते,२४ तासापैकी २० –२० तास अध्ययन करून विद्येची अखंड सेवा करणारे आंबेडकर ,राज्यघटनेच्या ४५ व्या कलमान्वये १४ वर्षाखालील बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करणारे शिक्षणतज्ञ म्हणजे डॉ. आंबेडकर, मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध भारत सारखे समाजमन पेटविणारे वृत्तपत्र चालविणारे एक झुंजार पत्रकार ,जगातील सर्वात मोठ्या संसदीय शासन प्रणालीचे प्रणेते ,एक जहाल अभ्यासू वक्ता , शेकडो वैचारिक पुस्तके लिहणारे एक मर्मभेदि जागतिक दर्जाचा लेखक ,भारतीय जलनीतीचे संकल्पक आणि कुटुंब नियोजनचे प्रवर्तक , शेतकरी–शेतमजूर–कामगारांचे नेते, धार्मिक,सामाजिक , आर्थिक,राजकीय, शैक्षणिक,कृषी,आद्योगिक साहित्यिक क्षेत्रात अत्युच्च कार्य करणारा यशस्वी नेता म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ....... ही न संपणारी विश्वव्यापी कार्याची यादी आहे. संपूर्ण भारतीयांसाठी आपले जीवन चंदनासम झिजविणाऱ्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना ६८ व्या महापरिनिर्वाणा निमित्त भावपूर्ण आदरांजली ! मुंबईच्या अरबी समुद्राच्या किनारी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अंत्यविधी लाखो डोळ्यातून वाहणाऱ्या अश्रूंच्या आणि लाखो विदीर्ण हृदयातून उठणाऱ्या कंपनाच्या साक्षीने पार पडला.चैत्यभूमीला स्पर्श करणाऱ्या अरबी सागराला भावनिक साद घालतांना भीमकवी प्रल्हाद शिंदे लिहतात, अरे सागरा,अरे सागरा ! भीम माझा इथे निजला,शांत हो जरा !!



– श्री बाजीराव नवनाथ ढाकणे

पान ४ वरून पुढे...

## बिबट्यासह वन्य ....

वारंवार संकटाशी खेळणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाने दिवसाचा विजपुरवठा करावा जेणेकरून त्याच्यावरील अपघाताचे घोंगावणारे संकट दूर होऊ शकेल. शासनाने आणि विजवितरण कंपनीने याचा गंभीर्यपूर्वक विचार करावा अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी दिला आहे. अस्मानी आणि सुलतानी संकटाचा नेहमीच शेतकऱ्यांना सामना करावा लागतो. कमी असलेला हमीभाव, कधी दुष्काळ तर काढू अतिवृष्टी अशा या ना त्या कारणाने नेहमीच संकटे घोंगावत असतात. त्यातच शासनाने आता रात्रीचा विजपुरवठा सुरु केला आहे. रात्रीच्या वेळी वन्य प्राण्यांचा वावर असतो. साप, विंचू, रानडुक्कर तसेच काही ठिकाणी बिबट्याचा मुक्त संचार असल्याच्या घटना निदर्शनास येत आहेत. त्यांच्यापासून शेकऱ्यांना धोका निर्माण झाला आहे. अशातच रात्रीच्या वेळी पिकाला पाणी देण्यासाठी शेतात गेलेल्या शेतकऱ्यांवर ते हल्ले करत असल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यात अनेकांना आपला आपला जीव गमवावा लागला तर अनेकांना कायमस्वरूपी अपंगत्व आले आहे. या घटना टाळव्यात यासाठी शासनाने दिवसा विजपुरवठा करावा अन्यथा महावितरण कंपनीच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी दिला आहे.

## जि. प. सदस्य...

तुळशीरामजी वाघमारे पत्रकार आर आर आबा पत्रकार आतिक भाई पत्रकार सुभाषरावजी शिंदे पत्रकार विष्णू राठोड सोसायटीचे चेअरमन मा श्री जयराम नाटकर सदस्य विकास नाना हात्ते दत्ता शिंगणे उपसरपंच राधाकिसन महाराज शिंगणे मा श्री सुनील नाटकर दत्ताभाऊ हात्ते दिलीप काळे शाहू मोरे मदन हात्ते बाळासाहेब कासकर मजीत जिजा शिंदे कैलास मोरे दत्ता मोरे नारायण बहिर नजीर भाई कुरेशी माळहिवरा सोसायटीचे चेअरमन मा श्री दादा काकडे ह भ प गायन सम्राट माने महाराज ह भ प गणेश महाराज बोचरे ह भ प गणेश महाराज कचरे ह भ प तिवारी महाराज ह भ प रामप्रसाद महाराज पिंपळे ह भ प विकास महाराज मुटके ह भ प माखले महाराज जिजा ह भ प कवडे नाना ह भ प श्रीमंत नाना कासकर ह भ प बळीराम महाराज बहिर ह भ प जोगदंड महाराज ह भ प कृष्णा आबा हात्ते ह भ प आन्सराम महाराज हात्ते ह भ प कल्याण महाराज राऊत ह भ प घुले महाराज ह भ प लक्ष्मण महाराज काळे मृदंगाचार्य कदम महाराज काकडे महाराज व महिला मंडळ युवक नागरिक व तलवाडा व तलवाडा परिसरातील युवक नागरिक यांनी मोठ्या उत्साहामध्ये सुरेश हात्ते साहेब यांचा वाढदिवस साजरा करून त्यांना वाढदिवसाच्या निमित्ताने मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

## माजी मंत्री जयदत्त....

संत एकनाथ विद्यालय पालसिंगन, कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर (का.), कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिरूर (का.), औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय बीड, कला, वाणिज्य व विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय पिंपळनेर, श्री गजानन सहकारी सुतगिरणी लि.ईट, वडगाव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडगाव (गुंधा), ग्रामिण रूग्णालय येळंबघाट, बीड तालुका दूध संघ पाली आदि ठिकाणी भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन दि.०७/१२/२०२४ रोजी करण्यात आले असून सर्व दानापेक्षा रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. रक्ताचा एक थेंब जीवदानासाठी असे रक्तदानाचे महत्त्व लक्षात घेऊन परिसरातील सर्व नागरिक, पालक, युवक, कार्यकर्ते व विविध क्षेत्रामध्ये कार्य करणारे पदाधिकारी यांनी रक्तदान करण्यासाठी शनिवार दि.७ डिसेंबर रोजी सकाळी ठिक ९.०० वा. उपस्थित राहून जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन अधिकारी, पदाधिकारी, प्राचार्य, मुख्याध्यापक यांनी केले आहे.

## आपला परिसर वृध्दाश्रमात...

परिसर वृध्दाश्रम कळसंबर येथे साजरा करण्याची अभिनव कल्पना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ढास डी. के. यांनी मांडली. याप्रसंगी वृध्दाविषयी आपल्या भावना व्यक्त करताना त्यांनी म्हटले की, समाज व्यवस्थेचे होत जाणारे विघटन, व्यस्त कुटुंब संस्थामुळे वृध्दाश्रमा सारखा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे. ही अत्यंत दुदैवी समस्या आहे. कोणत्याही वृध्दांना आश्रमात राहण्याची वेळ येऊ नये. तर आपला परिसर वृध्दाश्रमाच्या संचालिका यांनी यावेळी वृध्दाश्रमातील वृध्दांची दिनचर्या व समस्या यांची माहिती दिली. नंतर वृध्दांश्रमाला राशन व फळांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मुजावर एस. टी. तर आभार डॉ. अंकुश काळे यांनी व्यक्त केले याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## देवेंद्र फडणवीस यांनी...

महायुती सरकारच्या शपथ विधीचा लाईव्ह कार्यक्रमाचे आ.लक्ष्मण पवारांच्या संपर्क कार्यालयात आयोजन करण्यात आले होते यावेळी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथग्रहण सुरु असतांना गेवराई भाजपा कार्यालयात पेढे वाटून फटाके फोडून जल्लोष साजरा करण्यात आला होता यावेळी नागरिकांसह पदाधिकाऱ्यांसह कार्यक्रत्यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती

## चिंचोटी येथे नैसर्गिक...

यावेळी श्रद्धा भवारी मॅडम आपल्या भाषणात म्हणाल्या की सध्याच्या रासानिक खतांच्या,किरनाशकांचा जास्त वापरा मुळे मानवी जिवनावर मोठा परीणाम होत आहे.यामधून कॅन्सर सारख्या भयानक आजाराला सामोर्य जावे लागत आहे.यावर एकच उपाय म्हणजे आपल्याला सेंद्रीय शेती करणे.पुर्वी सारखे गावरान खाद्य शेतीत पिकवणे काळाची गरज आहे.यामध्ये आपण घरच्या घरी कमी खर्चात सेंद्रीय शेती करण्यासाठी शेन खत,कंपोस्ट खत,गांडुळ खत,गोमुत्र,दसपर्नी अर्क,डि कंपोज,जिव अमृत यासारखी शेतीसाठी लागणारे घटक आपण तयार करु शकतो.या दिलेल्या बॅलर मध्ये पाणी न साठवता दशपर्णी अर्क व जीवामृत तयार करावे असे यावेळी त्यांनी सांगितले.या कार्यक्रमासाठी, मंडळ कृषी अधिकारी टोम्पे साहेब, कृषी पर्यवेक्षक खराडे साहेब,आत्माचे ए टी एम सुदर्शन आंधळे,कृषी सहाय्यक कोठुळे साहेब कृ सा भुजबळ साहेब,कृ सा तिडके साहेब,कृ प इंगळे साहेब,कृ प तारकर,पशुवैद्यकिय अधीकारी तांदळे साहेब,ग्राम विकास अधिकारी सत्यवान कशिद,सरपंच भागवत गोंडे,विधाका शेतकरी कंपनीचे अध्यक्ष धनपाल काका गोंडे यांच्यासह शेतकरी बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.कार्यक्रमचे सुत्र संचलन ठोंबरे साहेब यांनी केले तर उपस्थीत मान्यवर व शेतकरी बांधवांचे आभार सुमंत (मुन्ना) गोंडे यांनी मानले.

दैनिक मराठवाडा पत्र
● epaper.marathwadapatra.com
● dailymarathwadapatra2021@gmail.com
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■
Mo. 9822152955

## बिबट्यासह वन्य प्राण्यांपासून शेतकऱ्यांच्या जीवितास धोका

### कृषी पंपाला दिवसाचा विजपुरवठा करा अन्यथा तीव्र आंदोलन करू! : राजेभाऊ फड

**परळी । प्रतिनिधी**



स्वतःचा जीव धोक्यात घालत अवघ्या जगाचे पालनपोषण करणाऱ्या बळीराजाच्या भोवती अनेक संकटे घोंगावत असतात. कधी कृत्रिम अडचणी येतात तर कधी कधी नैसर्गिक धोके निर्माण होतात. परळी तालुक्यात अनेक ठिकाणी बिबट्यासह अनेक वन्य जीवांचा मुक्त वावर असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यांच्यापासून हल्ले होण्याच्या शक्यता नाकारता येत नाहीत. त्यामुळे ▶▶ उर्वरित पान ३ वर



*मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी मंत्रालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच जिजामाता शहाजीराजे भोसले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्याही प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.*



*आज महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार हे शपथबद्ध होत आहेत, त्या पार्श्वभूमीवर मुंबईतील देवगिरी निवासस्थानी आ.धनंजय मुंडे यांनी अजित दादांची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या... यावेळी माजी आ.अमरसिंह भैय्या पंडित, माजी आ.संजय भाऊ दौंड आदी उपस्थित होते.*



*महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री माननीय अजित दादा पवार साहेब यांची मुंबई त्यांचा सत्कार करताना बप्पासाहेब घुगे साहेबराव पोपळे बारीकराव घुगे नवनाथ घुगे सुरेश घुगे पैलवान सर्जेराव गमे इत्यादी सत्कार करता वेळेस*



*राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना.अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्याबद्दल पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी भेट घेऊन सत्कार केला. यावेळी माजी नगरसेवक रविंद्र कदम हे उपस्थित होते.*




*मुंबई अनुशक्ती नगर विधानसभा मतदारसंघातून सना मलिक शेख जी यांची आमदार पदी निवड झाल्याबद्दल शुभेच्छा देताना शेख अमीन.*

# धनंजय मुंडेंचे सिरसाळा एमआयडीसी पूर्णत्वाच्या दिशेने महत्वाचे पाऊल

- मुंडेंनी प्रस्तावित केलेल्या औद्योगिक क्षेत्र विकास आराखड्यास एमआयडीसी ने दिली मंजुरी
- अधिग्रहित जमिनीवर मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते यांसह राखीव जागा निर्मितीस मंजुरी
- निवडणुकीत मुंडेंनी दिले होते परिपूर्ण एमआयडीसीचे आश्वासन; आमदार म्हणून शपथ घेण्याआधीच कामाला सुरुवात



**मुंबई । प्रतिनिधी**

परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी परळी तालुक्यातील शिरसाळा येथे औद्योगिक विभागाने अधिग्रहीत केलेल्या जागी पंचतारांकित एमआयडीसी पूर्ण करण्याचा ध्यास घेतलेला असून एमआयडीसीमध्ये प्रत्यक्ष उद्योगांना सुरुवात करण्याच्या दृष्टीने एमआयडीसी पूर्णत्वाच्या साठी अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे.

धनंजय मुंडे यांच्या विनंतीनुसार प्रस्तावित केल्याप्रमाणे शिरसाळा येथे अधिग्रहित करण्यात आलेल्या शासकीय जमिनीवर औद्योगिक क्षेत्रात पूरक बाबी विकसित करण्यास औद्योगिक विकास महामंडळाने मंजुरी दिली असून, यामध्ये प्रामुख्याने २० मीटर मुख्य रस्ता, १२ मीटर अंतर्गत रस्ते, १५ मीटर सर्व्हिस रस्ते यांसह लघु व मध्यम उद्योगांसाठी राखीव जागा (प्लॉट) निर्मितीसाठी त्याचबरोबर सहाय्यभूत सुविधा निर्माण करण्याच्या प्रस्तावास औद्योगिक विकास महामंडळाने मंजुरी दिली आहे. सिरसाळा येथे अधिग्रहित करण्यात आलेल्या जमिनीवर एकूण १६ हेक्टर क्षेत्र हे संबंधित सुविधांसाठी मंजुर करण्यात आले असून, यासाठी धनंजय मुंडे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

धनंजय मुंडे यांनी नुकत्याच संपन्न झालेल्या विधानसभा निवडणुकीत शिरसाळा येथील मंजूर असलेल्या एमआयडीसीला पूर्णत्वाकडे नेऊन या ठिकाणी पायाभूत सुविधांची निर्मिती करणे तसेच येथे उद्योगांना निमंत्रित करण्याचे आश्वासन दिले होते; या शब्दाला पूर्ण करण्यासाठी आणखी आमदार म्हणून शपथ घेणे सुद्धा बाकी असतानाच मुंडेंनी आपल्या कामाला सुरुवात केल्याचे पाहायला मिळत आहे.

सिरसाळ्यात सुमारे २०० हेक्टर पेक्ष्या अधिक क्षेत्र हे एम आयडीसी म्हणून घोषित करण्यात आले असून त्यापैकी ७८ हेक्टर पेक्षा अधिक जमीन आतापर्यंत अधिग्रहित करण्यात आली आहे. सदर ठिकाणास राष्ट्रीय महामार्ग, रेल्वे सह दळणवळणाच्या सोयी व पाण्याची उपलब्धता प्रमाणात असल्याने येथे उद्योग उभारणीस मोठा वाव आहे. त्यामुळे सदर एम आयडीसी पूर्ण झाल्यास याठिकाणी मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मिती करण्याचा धनंजय मुंडे यांचा प्रयत्न आहे.

## जि. प. सदस्य सुरेश हात्ते यांचा विविध उपक्रमानी वाढदिवस साजरा

**तलवाडा । प्रतिनिधी**



गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील माजी जिल्हा परिषद सदस्य माननीय श्री सुरेश हात्ते साहेब यांचा वाढदिवस असल्या कारणाने तलवाडा येथे त्वरितापुरी महाविद्यालय येथे रक्तदान शिबिर प्राथमिक आरोग्य केंद्र येथे फळवाटप व मतिमंद शाळा येथे विद्यार्थ्यांना फळ वाटप त्या नंतर रात्री ८ ते ११ ह भ प राजेंद्र महाराज वाघमारे यांचे किर्तन संपन्न झाले मा श्री सुरेश हात्ते साहेब हे तब्बल वीस ते पंचवीस वर्षापासून गेवराई तालुक्याचे नेतृत्व हात्ते साहेब हे करत आहेत. राजकारण करीत असताना उराशी बाळगून सामाजिक काम तन-मन-धनाने वारकरी संप्रदायाची सेवा करणारे गोरगरिबाला मदत करणारे गोरगरिबाच्या हितासाठी कल्याणासाठी नेहमी तळमळ करणारा कार्यकर्त्यावर जीवापाड प्रेम करणारा गेवराई तालुक्याचा नेता म्हणजे सुरेश हात्ते ह भ प राजेंद्र महाराज वाघमारे कीर्तन प्रसंगी बोलत होते. त्याप्रसंगी उपस्थित तलवाडा गावचे उपसरपंच मा श्री आजु भाई सौदागर मा श्री शेख अफसर भाई पत्रकार अल्ताफ भाई कुरेशी पत्रकार बापू गाडेकर पत्रकार ▶▶ उर्वरित पान ३ वर

## माजी मंत्री जयदत्त क्षीरसागरांच्या वाढदिवसानिमित्त जिल्ह्यात विविध ठिकाणी रक्तदान शिबीराचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

लोकनेते माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या ७४व्या वाढदिवसानिमित्त जिल्ह्यात विविध ठिकाणी शनिवार दि.७ रोजी भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त आण्णा क्षीरसागर यांच्या वाढदिवसानिमित्त विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड, गिता कन्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय बीड, शिवणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय शिवणी, गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राजुरी नवगण, सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकिय महाविद्यालय बीड, पाडळी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळी, यशवंत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कुर्ला, कामखेडा हायस्कुल कामखेडा, साक्षाळपिंप्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय साक्षाळपिंप्री, नागनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मोरगाव, आर्वी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आर्वी, पिंपळवाडी हायस्कुल पिंपळवाडी, अंजनवती हायस्कुल, अंजनवती, बोरखेड हायस्कुल बोरखेड, जगदंबा हायस्कुल राक्षसभुवन (तांबा), रायमोहा, चौसाळा, कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी, पाटोदा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाटोदा (बे.), कोरड्याचीवाडी हायस्कुल कोरड्याचीवाडी, लोणी हायस्कुल लोणी, ▶▶ उर्वरित पान ३ वर

## आपला परिसर वृध्दाश्रमात राशन व फळ वाटपाने खा. रजनीताई पाटील यांचा वाढदिवस साजरा

**नेकनूर । प्रतिनिधी**



माऊली विद्यापीठ केज संचलित प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय नेकनूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने माऊली विद्यापीठ केज संस्थेच्या संस्थापक सचिव खासदार रजनीताई पाटील यांचा वाढदिवस आपला परिसर वृध्दाश्रम, कळसंबर' येथे साजरा करण्यात आला. रजनी अशोकराव पाटील (५ डिसेंबर, १५८) भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या राजकारणी तसेच राज्यसभा सदस्य, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या जम्मू आणि काश्मीरच्या प्रभारी असणाऱ्या खासदार रजनीताई पाटील यांचा वाढदिवस आपला ▶▶ उर्वरित पान ३ वर

## देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेताच मा.आ.लक्ष्मण पवारांच्या भाजप कार्यालयात जल्लोष

**गेवराई । प्रतिनिधी**



विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपा महायुतीला घवघवीत यश मिळाले आहे त्यामुळे भाजपाचे विधीमंडळ गटनेते देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची घोषणा करण्यात आली होती तेव्हाच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच होणार जवळपास निश्चित झाले होते त्या.अनुषंगाने आज दि ५ डिसेंबर रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना उपमुख्यमंत्री अजित पवार व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पद व गोपनीयतीची शपथ दिली याप्रसंगी देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी, यांच्या अनेक राज्याचे मुख्यमंत्री तसेच केंद्रीय मंत्रिमंडळाती मंत्री उपस्थित होते. ▶▶ उर्वरित पान ३ वर

## चिंचोटी येथे नैसर्गिक सेंद्रीय शेतीचे प्रशिक्षण संपन्न जिवअमृत तयार करण्यासाठी शेतकर्यांना बॅलरचे वाटप

**वडवणी । प्रतिनिधी**




जागतिक मृदा दिनानिमित्त चिंचोटी येथे डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजने अंतर्गत सेंद्रिय गटाचे गावपातळीवर प्रशिक्षण घेण्यात आले.या प्रशिक्षणास मार्गदर्शन करण्यासाठी माजलगाव उपविभागीय कृषी अधिकारी श्रद्धा भवारी मॅडम, कृषी विकास अधिकारी श्री साहिल सय्यद सर, जिल्हा मृद चाचणी प्रयोगशाळा प्रमुख श्री सहदेव पाटील उपस्थीत होते.उपस्थीत मान्यवरांच्या शुभ हस्ते दशपर्णीअर्क जिवअमृत तयार करण्यासाठी २०० लिटरच्या बॅलरचे शेतकर वाऱ्यांना वाटप करण्यात आले.

सविस्तर वृत्त असे की ५ डिसेंबर हा मृदा दिन म्हणुन साजरा करण्यात येतो.त्या निमीत्ताने वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथे नैसर्गीक सेंद्रीय शेतीचे प्रशिक्षणात शेंद्रीय शेती विषयी शेतकर्यांना माजलगाव कृषी विभाग ऊप विभागीय अधिकारी श्रद्धा भवारी मॅडम या कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणुन लाभल्या होत्या त्यांच्या समवेत कृषी विकास आधीकारी साईल सय्यद,मृद शाळा प्रमुख सहदेव पाटील ता कृ अ भुजंगराव खेडकर,कृ प ठोंबरे साहेब,कृ प वेक्षक जाधवर,आत्माचे ए टी एम सुदर्शन आंधळे अदीं मान्यवरांनी शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.या वेळी शेंद्रीय शेती करण्यास शेतकऱ्यांना दशपर्नीअर्क व जीवअमृत तयार करण्यासाठी २०० लिटरच्या बॅलरचे वाटप करण्यात आले. ▶▶ उर्वरित पान ३ वर

## आदर्श देवगाव या ठिकाणी खंडोबा यात्रा महोत्सवाचे आयोजन



**वडवणी । प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी खंडोबा यात्रा महोत्सवाचे आयोजन वडवणी तालुक्यातील आदर्श देवगाव या ठिकाणी केलेले आहे, शनिवार दिनांक ०७/१२/२०२४ शनिवार रोजी सकाळी आठ वाजता श्री. खंडोबा लग्न समारंभ व तळी भंडरा कार्यक्रम होईल, व दुपारी चार वाजता गावची परंपरा असलेल्या गाड्या ओढण्याचा कार्यक्रम होईल, तसेच रविवार दिनांक ८,१२ ,२०२४, या दिवशी दुपारी एक ते चार या वेळेत जंगी कुस्त्याचा कार्यक्रम होईल, तरी पंचक्रोशीतील नागरिकांनी यात्रेतील कार्यक्रमाचा व कुस्त्याचा आनंद घ्यावा व उपस्थित राहण्याच आव्हान ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आला आहे.